# एईएमएलच्या कर्मचाऱ्यांची 'स्वच्छ भारत' अभियानाला साथ

मुंबई - अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल)च्या कर्मचाऱ्यांनी यंदाच्या गणेश चतुर्थीचा उत्सव वेगळ्या तऱ्हेने साजरा केला. भारत सरकारच्या 'स्वच्छ भारत अभियाना'नुसार, यंदाचा हा उत्सव कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी 'स्वच्छता ही सेवा' या चळवळीत योगदान देण्याची शपथ ग्रहण करून साजरा केला. सप्ताहभरापूर्वी भारत सरकारच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा मुव्हमेंट'च्या शुभारंभाची घोषणा करण्यात आली आहे. ही चळवळ म्हणजे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना त्यांच्या १५० व्या जन्मदिनाच्या निमित्ताने संपूर्ण देशभरातून त्यांना प्रिय असलेल्या स्वच्छतेची कास धरून आदरांजली व्यक्त करण्यासाठी आहे. या दोन आठवडे चालणाऱ्या देशव्यापी मोहिमेला पाठबळ म्हणून, एईएमएलचे कर्मचारी हे मुंबई शहरातील वेगवेगळ्या ठिकाणांवरील एईएमएल कार्यालयाच्या परिसरातील रस्त्यांच्या स्वच्छतेच्या कार्यात सहभागी होणार आहेत.